# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २९ जून, २०२६**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २६**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ३९, रूपये:- ७२,३५,८०,०००/-**<br>**श्री. संजय देरकर** |
| (१) | १६३८ | १०० | राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियानांतर्गत यवतमाळ जिल्ह्यात अन्नधान्य पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी सुधारित वाणांचा वापर, बीजप्रक्रिया, आंतरपीक पद्धती व रुंद वरंबा-सरी (BBF) तंत्राचा प्रसार करणे आवश्यक आहे. जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी सेंद्रिय व जैविक खतांचा वापर वाढवून एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनावर भर द्यावा. तसेच जलसंवर्धन, शेततळी निर्मिती व सूक्ष्म सिंचनाद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करावा. कीड व रोग व्यवस्थापनासाठी शिफारस केलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यासाठी आवश्यक निधी ची उपलब्धता व अन्य अनुषंगिक बाबी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२) | १६३३ | १० | भंडारा जिल्हयातील शेतक-यांना दिवसा किंवा १२ तास अखंडित विजपुरवठा उपलब्ध करणे, धान खरेदी केंद्रावरील भ्रष्टाचार व वजन काटयातील अनियमतता रोखण्यासाठी सीसीटीव्ही व्यवस्था अनिवार्य करुन वजन काटा डिस्प्ले वर दाखविणे, महाराष्ट्रातील सेंद्रिय शेती करणा-या शेतक-यांना विशेष प्रोत्साहन अनुदान व निर्यात सुविधा उपलब्ध करुन देणे, शेतक-यांना धानाचे बोनस, विमा व प्रोत्साहन रक्कम वितरणात नेहमीच विलंब होणे, शेतक-यांना मोबाईलवरुन थेट लाभ घेता येईल अशी ‘‘कृषी आधार ॲप’’प्रणाली उपलब्ध नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (३) | १६५५ | १० | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत गोदाम व्यवस्था करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत शेतकऱ्यांचे धान्य, बियाणे, खते व इतर कृषी निविष्ठांचे सुरक्षित साठवणूक व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये पुरेशा गोदाम सुविधांचा अभाव असल्याने शेतकऱ्यांना उत्पादन साठवणूक, गुणवत्ता जतन व बाजारभावानुसार विक्री करण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे कृषी उत्पादनाचे नुकसान होऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाच्या उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ठिकाणी आधुनिक व सुसज्ज गोदामांची उभारणी करणे गरजेचे आहे. याकरिता आवश्यक निधीची तरतूद करून गोदाम बांधकाम व संबंधित पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. त्यामुळे, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत गोदाम व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (४) | १५५१ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यात सोयाबीन, कापूस, भाजीपाला व इतर शेतमालाचे उत्पादन समाधानकारक झाले असले तरी बाजारपेठेत अत्यल्प दर मिळत असल्याने शेतकऱ्यांवर गंभीर आर्थिक संकट निर्माण झालेले असणे, उत्पादन खर्चामध्ये बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी व सिंचन खर्चात सातत्याने वाढ होत असताना शेतमालाला उत्पादन खर्चाइतकाही भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णतः बिघडलेले असणे, त्यामुळे “जगाचा पोशिंदा आम्ही, मग मालाला कवडीमोल भाव का?” असा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात असणे, हमीभाव धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली असणे, परिणामी शेतकरी कर्जबाजारीपणा व आर्थिक अडचणीत सापडत असणे, या पार्श्वभूमीवर शेतमालाला किमान आधारभूत दर (MSP) प्रभावीपणे लागू करणे, शासकीय खरेदी केंद्रे अधिक सक्षम व सुलभ करणे, बाजारभाव स्थिर ठेवण्यासाठी ठोस यंत्रणा उभारणे तसेच शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी दीर्घकालीन धोरण राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | १५५२ | १० | नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यातील मांडवा-लभानतांडा येथे सततची नापिकी, कर्जबाजारीपणा व आर्थिक विवंचनेमुळे एका अल्पभूधारक शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडलेली असणे, मृत शेतकरी नागराम सवाईराम राठोड यांच्याकडे सुमारे ३ एकर शेती असून सेंट्रल बँक ऑफ इंडिया, उमरेड शाखेकडील पीक कर्ज थकीत असल्याने व नव्या पीक कर्जासाठी बँकेकडून कर्ज उपलब्ध न झाल्याने ते गंभीर आर्थिक संकटात सापडलेले असणे, कर्जमाफी योजनेतील अटी-शर्तींमुळे अनेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याची भावना निर्माण झालेली असणे, खरीप हंगाम तोंडावर असताना बियाणे, खते व शेती मशागतीसाठी आवश्यक भांडवल उपलब्ध न झाल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष व मानसिक तणाव वाढत असणे, अशा परिस्थितीत शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढण्याचा गंभीर धोका निर्माण झालेला असणे, त्यामुळे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत व पुनर्वसन सहाय्य देणे, कर्ज पुनर्गठन व सुलभ पीक कर्ज उपलब्ध करून देणे, कर्जमाफी योजनेतील अटी शिथिल करून प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी ठोस व सर्वसमावेशक धोरण राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | १५५३ | १० | राज्यात शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीपासून संरक्षणासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. तथापि, सद्यस्थितीत या योजनेअंतर्गत पीक विमा घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर सुमारे रु.६०० इतका प्रीमियम भरावा लागत असल्याचे निदर्शनास येणे, तर यापूर्वी काही हंगामांमध्ये शेतकऱ्यांना अत्यल्प किंवा शून्य प्रीमियममध्ये पीक विमा उपलब्ध करून देण्यात येत होता. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना विमा संरक्षण घेणे कठीण होत आहे. यामुळे पीक विमा योजनेचा उद्देश पूर्णपणे साध्य होण्यावर परिणाम होत असल्याची भावना शेतकरी वर्गात निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून आकारण्यात येणारा प्रीमियम कमी करणे किंवा शासनाकडून अधिक सबसिडी देऊन शेतकऱ्यांचा आर्थिक भार कमी करणे, तसेच पूर्वीप्रमाणे अधिक सुलभ व शेतकरीहिताची विमा योजना लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | १५५४ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील आमगाव देवळी सर्कल परिसरात अलीकडील काळात गारपीट होऊन शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, या नैसर्गिक आपत्तीनंतर संबंधित यंत्रणेकडून पंचनामे करण्यात आलेले असतानाही बाधित शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत नुकसान भरपाईची रक्कम वितरित करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व आर्थिक अडचण निर्माण होणे, खरीप व रब्बी हंगामासाठी लागणारे भांडवल उपलब्ध न झाल्याने शेतकरी पुन्हा अडचणीत सापडणे, तसेच शासनाच्या मदत व पुनर्वसन योजनांचा लाभ वेळेत न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढणे. त्यामुळे आमगाव देवळी सर्कलमधील गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई वितरित करणे, प्रलंबित अनुदान देयकांची स्थिती स्पष्ट करणे तसेच भविष्यात नैसर्गिक आपत्तीनंतर मदत रक्कम वेळेत मिळण्यासाठी सुलभ व जलद प्रक्रिया लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (८) | १५५५ | १० | राज्यात शेतकऱ्यांच्या अचूक माहिती संकलनासाठी "अग्रीस्टॅक" प्रणाली राबविण्यात येत असून त्याद्वारे शेतीविषयक विविध योजनांचे लाभ व खत वाटपाचे नियोजन केले जात आहे. तथापि, या प्रणालीअंतर्गत युरिया खताच्या वाटपावर लावण्यात आलेल्या मर्यादेमुळे १० एकर शेती असलेल्या शेतकऱ्यांना केवळ १० बॅग युरिया मिळत असल्याचे निदर्शनास येणे, जे प्रत्यक्ष पिकांच्या गरजेशी विसंगत असल्याचे शेतकरी वर्गाचे म्हणणे असणे, त्यामुळे पिकांच्या पोषणासाठी आवश्यक खतांचा अपुरा पुरवठा होऊन उत्पादनक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होणे, तसेच शेतकऱ्यांना खतासाठी वारंवार अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्यात असंतोष निर्माण होणे.या परिस्थितीमुळे कृषी उत्पादनावर व शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यावर प्रतिकूल परिणाम होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे "अग्रीस्टॅक" प्रणालीतील खत वाटप निकषांचा पुनर्विचार करून शेतजमिनीच्या प्रत्यक्ष गरजेनुसार युरिया व इतर खतांचे लवचिक व शास्त्रीय वितरण धोरण निश्चित करावे, तसेच शेतकऱ्यांना पुरेसा खत पुरवठा वेळेत उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | १५५७ | १० | राज्यातील शेतकऱ्यांना महाडीबीटी योजनेंतर्गत अनुदानित अथवा मोफत सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात येत असणे, नागपूर जिल्ह्यातील भिवापूर येथील खरेदी-विक्री सहकारी संस्थेमार्फत सोयाबीन बियाणे वाटप करताना शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय महाजैविक नावाचे औषध सक्तीने देऊन त्यासाठी अतिरिक्त रक्कम आकारण्यात आलेली असणे, संबंधित औषधाची बाजारातील किंमत कमी असताना शेतकऱ्यांकडून जास्त दराने वसुली केल्याचा आरोप करण्यात आलेला असणे, महाडीबीटी अंतर्गत मंजूर झालेल्या शेकडो शेतकऱ्यांना बियाणे स्वीकारण्यासाठी संबंधित औषध खरेदी करणे बंधनकारक करण्यात आलेले असणे, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मोफत अथवा अनुदानित बियाण्यांसोबत शेतकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध कोणतेही उत्पादन विक्री करता येत नसल्याचे कृषी विभागाचे मत असणे, याप्रकरणी शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केलेली असणे, वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर महाबीजच्या अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थेत चौकशी करून शेतकऱ्यांकडून घेतलेली अतिरिक्त रक्कम परत करण्याच्या सूचना दिल्याची माहिती समोर आलेली असणे, तसेच शेतकऱ्यांना मूलभूत सुविधांचा अभाव व अयोग्य वागणूक मिळाल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या असणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे, शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात आलेली रक्कम परत मिळवून देणे, तसेच राज्यातील इतर ठिकाणीही अशा प्रकारचे गैरप्रकार होत नाहीत याची खात्री करण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१०) | १५५८ | १० | राज्यात खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांची बी-बियाणे व रासायनिक खते खरेदी करण्याची लगबग सुरू असताना अनेक भागांत डीएपी व युरिया खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण झालेला असणे, शासनाने निर्धारित केलेल्या किमतीत डीएपी खत उपलब्ध होत नसून पर्यायी खतांची विक्री अधिक दराने केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असणे, काही कृषी सेवा केंद्रांकडून शेतकऱ्यांना बी-बियाणे किंवा इतर कृषी साहित्य खरेदी केल्याशिवाय आवश्यक खते उपलब्ध करून दिली जात नसल्याचा आरोप होत असणे, खतांच्या उपलब्धतेत असमानता निर्माण झाल्यामुळे काळाबाजार, साठेबाजी व सक्तीची विक्री होत असल्याचा संशय व्यक्त केला जात असणे, कृषी विभागाकडून नियमित तपासणी व नियंत्रण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत नसल्याबाबत शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झालेली असणे, परिणामी खरीप हंगामाच्या पेरणीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, तसेच वाढत्या उत्पादन खर्चामुळे अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकरी अधिक अडचणीत सापडत असणे, या पार्श्वभूमीवर राज्यातील खतसाठ्याची जिल्हानिहाय व तालुकानिहाय तपासणी करणे, डीएपी व युरिया खतांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करणे, काळाबाजार व साठेबाजी करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करणे, कृषी सेवा केंद्रांकडून होत असलेल्या सक्तीच्या विक्रीची चौकशी करणे तसेच शेतकऱ्यांना योग्य दरात व वेळेत खते उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | १५५९ | १० | नागपूर जिल्ह्यासह राज्यातील कृषी केंद्र संचालकांनी दीर्घकाळापासून त्यांच्या विविध मागण्या शासनाकडे प्रलंबित असल्याने तीव्र नाराजी व्यक्त केलेली असणे, शासनाकडून वारंवार आश्वासने देऊनही प्रत्यक्षात मागण्यांची पूर्तता न झाल्याने राज्यातील कृषी केंद्र संचालकांनी २७ एप्रिलपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केलेले असणे, कृषी उत्पादनांच्या तपासणीदरम्यान घेतल्या जाणाऱ्या नमुन्यांचे (सॅम्पल) पैसे वर्षानुवर्षे अदा न होणे, नमुने फेल झाल्यास संबंधित कृषी केंद्रांवर थेट कारवाई व न्यायालयीन प्रकरणे दाखल होणे यामुळे संचालकांवर अन्याय होत असल्याचा आरोप करण्यात आलेला असणे, बियाणे व खत वितरणासाठी लागू करण्यात आलेल्या जटिल व कठोर ॲप-आधारित प्रक्रियांमुळे व्यवसाय करणे अवघड झाल्याची भावना व्यक्त होत असणे, एचटीबीटीसारख्या अवैध बियाण्यांची चोरमार्गाने विक्री होत असल्याने अधिकृत कृषी केंद्रांना आर्थिक फटका बसत असल्याचा दावा करण्यात आलेला असणे, तसेच खत विक्रीसंदर्भातील लिंकिंग व अनावश्यक अटींमुळे शेतकरी व विक्रेते दोघेही अडचणीत आल्याचे निदर्शनास आलेले असणे, या पार्श्वभूमीवर कृषी केंद्र संचालकांच्या प्रलंबित मागण्यांचा सखोल आढावा घेणे, सॅम्पल तपासणी व मोबदला प्रणालीतील त्रुटी दूर करणे, बियाणे व खत वितरण प्रक्रियेतील जाचक अटी शिथिल करणे, अवैध बियाण्यांच्या विक्रीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे तसेच कृषी व्यवसाय सुलभ व पारदर्शक करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१२) | १५६० | १० | नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यासह राज्यातील अनेक भागांत शासकीय हमीभावाने सुरू असलेली चणा खरेदी अचानक बंद करण्यात आलेली असणे, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन (नाफेड) अंतर्गत सुरू असलेली चणा खरेदी प्रक्रिया २० एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता पोर्टल बंद करून थांबविण्यात आलेली असणे, तर नोंदणीची अंतिम तारीख २९ एप्रिलपर्यंत असताना खरेदी प्रक्रिया आधीच बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झालेली असणे, शेतकऱ्यांनी उत्पादन विक्रीसाठी पूर्वनोंदणी करूनही त्यांचा माल खरेदी न झाल्याने आर्थिक नुकसान झाल्याची स्थिती निर्माण झालेली असणे, सध्या खुल्या बाजारात चण्याला हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक फटक्याला सामोरे जावे लागत असणे, बारदाणा वेळेवर उपलब्ध न झाल्याने खरेदी प्रक्रिया विस्कळीत झालेली असणे, अनेक शेतकऱ्यांकडे हजारो क्विंटल चणा शिल्लक राहिल्याने त्यांच्यासमोर गंभीर आर्थिक अडचण निर्माण झालेली असणे, या पार्श्वभूमीवर चणा खरेदी प्रक्रिया तत्काळ पुन्हा सुरू करणे, खरेदीची मुदत वाढविणे, नोंदणीकृत शेतकऱ्यांचा संपूर्ण माल हमीभावाने खरेदी होईल याची खात्री करणे तसेच भविष्यात अशा प्रकारच्या तांत्रिक व प्रशासकीय त्रुटींमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | १५६१ | १० | नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यातील मालेवाडा येथे आग लागून आठ एकर क्षेत्रातील मका पीक पूर्णपणे जळून खाक झाल्याची गंभीर घटना घडलेली असणे, सदर शेतकरी विलास दयाराम मेश्राम यांनी भाडेतत्त्वावर शेती करून नव्या प्रयोगातून मका पिकाची लागवड केलेली असणे, पीक जोमात आलेले असतानाच अचानक लागलेल्या आगीमुळे संपूर्ण पिकाचे मोठे नुकसान झालेले असणे, स्थानिक शेतकऱ्यांच्या मते शेजारील शेतात लागलेल्या आगीमुळे व वाऱ्याच्या जोरामुळे ही आग पसरल्याची शक्यता व्यक्त करण्यात आलेली असणे, मात्र आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट न झाल्याने परिस्थिती संशयास्पद व अनिश्चित राहिलेली असणे, या घटनेत सुमारे पाच लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आलेला असणे, त्यामुळे संबंधित शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला असणे, या पार्श्वभूमीवर झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्याला योग्य व पूर्ण भरपाई मंजूर करणे, आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी सखोल चौकशी करणे, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शेतस्तरावर अग्निशमन व प्रतिबंधात्मक उपाययोजना मजबूत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ४३, रूपये:- १०,६४,०००/-**<br>**श्री. संजय देरकर** |
| (१४) | १६३७ | १०० | यवतमाळ जिल्ह्यात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात प्रात्यक्षिक शेत विकसित करून शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी सेंद्रिय कर्ब वृद्धी, माती परीक्षण आणि रासायनिक खतांच्या वापरात टप्प्याटप्प्याने घट करण्यावर भर देणे गरजेचे आहे. देशी गाय आधारित जीवामृत, बीजामृत व इतर स्थानिक निविष्ठांच्या वापराला प्रोत्साहन देत उत्पादन खर्च कमी करण्यासाठी विशेष अनुदान व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे. तसेच जलसंधारण, सूक्ष्म सिंचन आणि पाणी व्यवस्थापनाच्या उपाययोजनांद्वारे हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यास सक्षम अशी शाश्वत शेती व्यवस्था उभारण्याची आवश्यकता आहे. महिला व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा सहभाग वाढवून नैसर्गिक शेतीच्या उत्पादनासाठी बाजारपेठ व मूल्यसाखळी विकसित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | १६३९ | १०० | यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे बीज चाचणी, रासायनिक खत नियंत्रण व कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा स्थापन केल्यास शेतकऱ्यांना दर्जेदार कृषी निविष्ठांची खात्री मिळून बोगस बियाणे, खते व कीटकनाशकांमुळे होणारे नुकसान टाळता येईल. स्थानिक पातळीवर नमुन्यांची जलद तपासणी होऊन अहवाल वेळेत उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ व खर्च वाचेल. तसेच दोषी उत्पादक व विक्रेत्यांवर तातडीने कारवाई करणे शक्य होऊन कृषी क्षेत्रात गुणवत्ता नियंत्रण अधिक प्रभावी होईल. परिणामी, पिकांची उत्पादकता वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत मिळेल. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (१६) | १६५४ | १०० | अमरावती जिल्ह्यातील शेतकरी सध्या अत्यंत गंभीर आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. गतवर्षी अतिवृष्टी व प्रतिकूल हवामानामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असतानाही प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अत्यल्प परतावा मंजूर करण्यात आला आहे. शेतकरी, केंद्र शासन व राज्य शासन यांनी मिळून सुमारे १३.१४ कोटी रुपये प्रीमियम जमा केला असताना केवळ सुमारे २.५० कोटी रुपयांचा परतावा मंजूर झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. जिल्ह्यातील लाखो शेतकरी योजनेत सहभागी असूनही अत्यल्प संख्येतील शेतकऱ्यांनाच लाभ मिळाला आहे. त्यामुळे विमा कंपनीच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. दुसरीकडे खरीप हंगामाच्या तोंडावर रासायनिक खतांच्या दरवाढीमुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. विशेषतः युरिया खतासोबत इतर महागडी व अनावश्यक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विनाअनुदानित उत्पादने सक्तीने विकली जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या प्रकारामुळे आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढत असून त्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे.याशिवाय अंजनगाव सुर्जी परिसरात प्रामुख्याने घेतल्या जाणाऱ्या औषधी गुणधर्म असलेल्या पानपिंपरी पिकावर यंदाच्या तीव्र उष्णतेचा मोठा परिणाम झाला आहे. ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तापमानामुळे वेलींची पानगळ, पाने पिवळी पडणे, कडा जळणे व उत्पादनात मोठी घट होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. बारी समाजातील अनेक शेतकरी व शेतमजूर करार पद्धतीने हे पीक घेत असल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील परताव्याबाबत पुनर्विचार करून पात्र शेतकऱ्यांना न्याय देणे, खत विक्रीतील सक्तीच्या प्रकारांना आळा घालणे तसेच उष्णतेमुळे नुकसान झालेल्या पानपिंपरी उत्पादक शेतकऱ्यांना विशेष आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ४५, रूपये:- ४०,४०,००,०००/-**<br>**श्री. रामदास मसराम** |
| (१७) | १६५७ | १० | राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत जैविक प्रयोगशाळा स्थापनेसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत आरमोरी, कुरखेडा व कोरची हे तालुके जंगलव्याप्त, दुर्गम व कृषीप्रधान क्षेत्र आहेत. या भागातील बहुतांश शेतकरी नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती व स्थानिक संसाधनांवर आधारित शेती पद्धती अवलंबण्यास इच्छुक आहेत. तथापि, जैविक खते, जीवामृत, बीजामृत, दशपर्णी अर्क, नैसर्गिक कीटकनाशके व इतर जैविक निविष्ठा तयार करण्यासाठी आवश्यक प्रयोगशाळा व तांत्रिक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.शेतकऱ्यांना त्यांच्या शेतावरच नैसर्गिक निविष्ठा तयार करता याव्यात, उत्पादन खर्च कमी व्हावा, रासायनिक खत व कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी व्हावे तसेच पर्यावरणपूरक शेतीला चालना मिळावी यासाठी आरमोरी, कुरखेडा व कोरची तालुक्यांमध्ये जैविक लॅब व नैसर्गिक कीटकनाशक निर्मिती प्रयोगशाळा स्थापन करणे आवश्यक आहे. त्यामुळे राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत आरमोरी, कुरखेडा व कोरची या तालुक्यांमध्ये शेतकरी गट, एफपीओ व ग्रामस्तरावर जैविक प्रयोगशाळा व नैसर्गिक कीटकनाशक निर्मिती केंद्रे उभारण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करून तो तातडीने उपलब्ध करून द्यावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ४८, रूपये:- १,३७,२९,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१८) | १५४२ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुका हा राज्यातील प्रमुख डाळिंब उत्पादक तालुक्यांपैकी एक असून तालुक्यात मोठ्या प्रमाणावर डाळिंब लागवड केली जाते. हवामानातील बदल, अवकाळी पाऊस, तापमानातील चढ-उतार व आर्द्रतेमुळे डाळिंब पिकावर रोग व किडींचा प्रादुर्भाव वाढून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. विंड्स (Weather Information Network Data System - WINDS) प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यासाठी केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याची तरतूद असताना सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये आवश्यक त्या प्रमाणात हवामान केंद्रांची उभारणी झालेली नाही. परिणामी शेतकऱ्यांना स्थानिक हवामानाची अचूक माहिती, रोग-किडींचे पूर्वसूचना संदेश तसेच सिंचन व पीक व्यवस्थापनासाठी आवश्यक मार्गदर्शन वेळेत मिळत नाही. तरी सांगोला तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यासाठी आवश्यक निधीची तातडीने तरतूद करावी, विंड्स प्रकल्पांतर्गत प्रस्ताव मंजूर करून केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (१९) | १६४४ | १०० | तासगाव तालुक्यातील येळावी, विसापूर आणि तासगाव मंडलमधील एप्रिल महिन्यातील पावसाच्या नोंदींमध्ये झालेला घोटाळा,याबद्दल शेतकरी व लोकप्रतिनिधी यांच्याकडून वारंवार चौकशीची होत असलेली मागणी, या संदर्भात कृषी विभागाने संबंधित कंपनीला फक्त नोटीस बजावलेली असणे, परंतु त्यावर न झालेली कोणतीही कारवाई, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**बाब क्रमांक: ५६, रूपये:- ८५,४४,०००/-**<br>**श्री. संजय देरकर** |
| (२०) | १६४० | १०० | यवतमाळ जिल्ह्यात राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रम (NADCP) प्रभावीपणे राबविणे आवश्यक असून त्याद्वारे लाळखुरकुत (FMD) व ब्रुसेलोसिस या गंभीर पशुरोगांवर नियंत्रण मिळवून पशुधनाचे संरक्षण करता येईल. या रोगांमुळे होणारी दूध उत्पादनातील घट, गर्भपात, वंध्यत्व आणि पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होईल. तसेच ब्रुसेलोसिससारख्या मानवांमध्ये पसरणाऱ्या रोगांचा धोका कमी होऊन सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण होईल. जनावरांचे इअर-टॅगिंग, डिजिटल |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नोंदणी व नियमित मोफत लसीकरणामुळे पशुधन व्यवस्थापन अधिक सक्षम होईल. फिरत्या पशुवैद्यकीय सेवांच्या माध्यमातून दुर्गम भागातील पशुपालकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचून पशुसंवर्धन क्षेत्राच्या शाश्वत विकासाला चालना मिळेल. यादृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (२१) | १६१० | १० | पशुवैदयकीय महाविदयालय गोरेगांव (पुर्व) स्थित पशु रुग्णालय येथे पशु तपासणी करिता पशुवैदयकीय अधिकारी, कर्मचारी, यांची कमतरता असणे, पशुंच्या तपासणी करिता अदयावत उपकरणे, यंत्रसामुग्री नसणे, यास्तव पशु रोगावर नियंत्रण करणे कठीण असणे, या सर्वामुळे पशुप्रमींमध्ये वाढता असंतोष असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२२) | १६३० | १० | साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यामध्ये पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या स्वतंत्र इमारती उपलब्ध नसणे, पशुवैद्यकीय अधिकारी आणि सहायक कर्मचारी पदे रिक्त असल्याने जनावरांच्या रोग प्रतिबंधक उपाययोजना व उपचार वेळेत होत नसणे, पशुपालकांच्या दारात संपूर्ण वैद्यकीय सेवा पोहोचविण्यासाठी मोबाईल व्हेटनरी युनिट्स नसणे, गावपातळीवर पशु आरोग्य शिबिरे व जनजागृती मोहीम न होणे त्यामुळे पशुपालकांना रोगांची वेळेत माहिती होत नसणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | १६३१ | १० | साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यामध्ये जनावरांसाठी हिरवा चारा विकास योजना प्रभावीपणे राबविली जात नसल्याने उन्हाळयात पशुखाद्य टंचाई निर्माण होणे. रोगराईच्या हंगामात लसीकरण मोहिम वेळेत राबविल्या जात नसणे, त्यामुळे मोठया प्रमाणावर जनावरांचा मृत्यु होत असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (२४) | १६४५ | १०० | सांगली जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागात मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असणे, डॉक्टर ते पर्यवेक्षक या सर्वच संवर्गात मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असणे, यासंदर्भात पशू पालक शेतकरी, लोकप्रतिनिधी यांनी वारंवार मागणी करून देखील शासनाने न केलेली पद भरती, यामुळे जनावरांच्या आरोग्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न , शासनाने पद भरती करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: १०३. कुक्कुट विकास**<br>**बाब क्रमांक: ५९, रूपये:- १,५०,२६,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२५) | १५८० | १० | सन २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होत असताना राज्यातील नागरिकांना जागतिक दर्जाचे शिक्षण, आरोग्य सेवा व त्याचे जीवनमान उंचावणे आर्थिक समृद्धी मिळविण्यासाठी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने दुग्ध व्यवसाय आणि कुक्कुट पालन या शेती पूरक जोड धंद्याना उद्योजकतेचे स्वरूप देण्याचा मुख्य उद्देश आहे परंतु राज्यातील शेती पुरक व्यवसायांना देण्यात येणारे अनुदान अत्यल्प आहे. तरी सदरच्या अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०४, दुग्धव्यवसाय विभाग**<br>**बाब क्रमांक: ६५, रूपये:- ११,५९,५४,०००/-**<br>**श्री. अनंत (बाळा) नर** |
| (२६) | १६२९ | १० | आरे दुग्ध वसाहतीमधील शासकीय जागेत होणा-या अतिक्रमणांवर प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाचे सुरक्षा रक्षक यांची नेमणूक करुन देखील आरे दुग्ध वसाहतीमध्ये मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकाम होत असल्याने तेथील शासकीय जागेवर अतिक्रमण होऊन परिणामी आरे दुग्ध वसाहतीचे फार मोठे नुकसान होणे, उक्त अतिक्रमणांवर निर्बंध घालण्यासाठी सुरक्षा रक्षक यांची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २५ जून, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई